<u>वादी तर्फे साक्षीदार क्र. –१</u>

<u>नि.दि.दा.क्र.७३/२०२३</u>
**यादवराव विरुध्द मनोहर**

**मी शपथपूर्वक खरे सांगतो की**

**निशाणी – ३१ खाली सुरू**

**उलटतपास प्रतिवादी तर्फे वकील श्री पुडके यांच्यातर्फे शपथेवर सुरू**

११. मला माझ्या घराचा घर नंबर माहिती नाही. माझ्या घराचे मोजमाप २० फुट रूंद व १६० फुट लांब आहे. मला दिशा कळत नाही. हे म्हणणे खरे आहे की मला माझ्या घराचे मोजमाप पूर्व पश्चीम किती व उत्तर दक्षिण किती आहे हे दिशा कळत नसल्यामुळे सांगता येणार नाही. मी राहत असलेले घर चार पिढयांपासून आहे. घर बांधतांना बांधकाम परवाना घेतला होता काय याची मला माहिती नाही. माझ्या घराचे बांधकाम परवान्यानुसार व नियमानुसार आहे असे दाखविणारा कागद माझ्या कडे नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या घराचे बांधकाम नियमानुसार नसल्याने तसा कागद माझ्या कडे नाही.

१२. माझ्या कडे माझ्या व प्रतिवादीच्या घराच्या दरम्यान जाण्या येण्यासाठी सहा फुटाची गल्ली असल्याबाबत दाखविणारा कागद नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या व प्रतिवादीच्या घराच्या दरम्यान सहा फुटाची गल्ली नसल्याने तसा कागद माझ्या कडे नाही. हे म्हणणे खरे नाही की त्या गल्लीतून आजूबाजूचे लोक ये–जा करतात हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की मी राहत असलेल्या ठिकाणी जास्त लोकवस्ती असल्याने लोकांची घरे एकामेकाला लागून आहे व त्यामुळे कोणाच्याही घराच्या दरम्यान सहा फुटाच्या गल्ल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की माझ्या घराच्या समोर रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादीच्या घरासमोर रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की त्या रस्त्याने लोक ये–जा करतात.

१३. हे म्हणणे खरे आहे की प्रतिवादी माझ्या शेजारी राहतात. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी सोबत माझे पटत नाही. हे म्हणणे खरे आहे की हि केस दाखल करण्यापूर्वी माझे व प्रतिवादीचे भांडण झाले होते. साक्षीदार सांगतो की ते भांडण जागेच्या मोजणी वेळी झाले. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी चे व माझे पटत नसल्याने त्याचे बांधकाम थांबविण्यासाठी मी प्रतिवादी विरूध्द खोटी तक्रार दिली.

१४. हे म्हणणे खरे नाही की प्रधानमंत्री आवास योजने मध्ये लाभ देण्यापूर्वी लाभार्थ्याची पूर्ण चौकशी केली जाते.

प्रश्न – प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल देणे असलेल्या लाभार्थ्याची त्याच्या कडे जागा असल्याबाबत चौकशी केली जाते ?

(वादी तर्फे वकील श्री गजबे यांनी सदरचा प्रश्न प्रतिवादी क्र.१ कडून या साक्षीदाराला विचारता येणार नाही असा आक्षेप नोंदविला. प्रतिवादी तर्फे वकीलांनी सदर बाब सरतपासाच्या प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केल्याने चौकशी बाबत विचारता येईल असे उत्तर दिले. या प्रकरणी वादीने सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात परिच्छेद क्र.२ मध्ये प्रतिवादी क्र.२ ने कोणतीही चौकशी न करता प्रतिवादीला घरकुल योजने करीता बेकायदेशीर फंड दिला असे कथन केले. या पुराव्या वरून सदरचा प्रश्न वादीला विचारता येईल असे या न्यायालयाचे मत आहे. सबब हरकत नामंजूर.)

उत्तर – चौकशी केली जात नाही.

१५. प्रतिवादीच्या मिळकतीच्या व त्याची प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत घरकुल लाभ मंजूर करणा–या अधिकारीने चौकशी केली होती काय याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीला कोणतीही चौकशी न करता घरकुल योजनेचा फंड दिला हे मी खोटे सांगत आहे. फंड बेकायदेशीर दिला याबाबत मी जिल्हाधिकारी किंवा आयुक्त यांच्या कडे तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने सहा फुटाची गल्ली अस्तीवात नसल्याचे तश्या गल्लीमध्ये कोणतेही बांधकाम केले नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने मला भांडण करून लाथाबुक्यांनी मारहाण केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की लाथाबुक्यांनी मारहाण केली नसल्याने त्याची तारीख व वेळ माझ्या पुराव्यात नमूद नाही.

१६. हे म्हणणे खरे आहे की मी ग्राम पंचायत, गट विकास अधिकारी व पोलीस स्टेशन यांच्या कडे दिलेल्या तक्रारीवरून प्रतिवादी क्र.१ विरूध्द कोणतीही कारवाई झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने केलेले बांधकाम चुकीचे केले नसल्याने निर्दशनास आल्याने या तिघांनीही प्रतिवादी विरूध्द कारवाई केली नाही.

१७. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादी ने शासकीय नियमानुसार बांधकाम केले. मी

प्रतिवादीचे बांधकामाचे मोजमाप केलेले नाही. मी भूमी अभिलेख कार्यालयाकडे माझी व प्रतिवादीची जागा मोजून मागितली नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्या व प्रतिवादीच्या घराच्या दरम्यान सहा फुटाची गल्ली नसल्याचे माहित असूनही प्रतिवादीला त्रास देण्यासाठी त्याच्या विरूध्द तक्रारी केल्या. हे म्हणणे खरे नाही की माझ्या घराच्या बाजूला प्रतिवादीची जागा आहे. ती जागा सरकारी मालकीची आहे. मी किती फुट आहे याची मी मोजणी केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की निशाणी ३६ ते ५२ कडे दाखल केलेले कागदपत्रे व त्यामध्ये दाखल केलेल्या तक्रारी खोटया दाखल केल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीला पूर्ण चौकशी झाल्यानंतर घरकुलाचे पैसे मिळाले. हे म्हणणे खरे नाही की प्रतिवादीने त्याच्या स्वत:च्या मालकीच्या जागेवर बांधकाम केलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की मी खोटे प्रतिज्ञापत्र दाखल करून खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपासणी नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

**स्वाक्षरी/-**
( मोहन रा. कामत )
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, कामठी

कामठी
दिनांक १८/०९/२०२४